MHYA050030722024

दाखल तारीख –०१/०८/२०२४
नोंदणी तारीख – ०२/०८/२०२४
निकाल तारीख – ३१/०७/२०२६
कालावधी – ०१ व. ११ म. ३० दि.

# न्यायनिर्णय

(दिनांक ३१/०७/२०२६ रोजी जाहिर केला)

प्रस्तुतचा खटला आरोपीविरूध्द महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई अन्वये चालविण्यात आला आहे.

२. अभियोग पक्षाचा आणि आरोपीचे वकिलांचा युक्तीवाद ऐकला. अभियोग पक्षाचा युक्तीवाद व अभिलेखावरील पुरावे यावरून खालील मुद्दे माझे निदर्शनास आले असुन त्यावरील निष्कर्ष मी खालीलप्रमाणे कारणांसह नोंदवित आहे.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | दिनांक २२/०६/२०२४ रोजी ०१२.०० वाजताच्या सुमारास लोहरा ईजारा, ता. पुसद, जि. यवतमाळ येथे आरोपीने त्याच्या घरी एका प्लॅस्टीक डबकीत १२ लिटर हातभटटी दारु अशी एकूण किंमत ७००/– रुपयाचा मुद्देमाल अवैधरीत्या बाळगतांना मिळुन आला व त्याद्वारे महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई नुसार शिक्षापात्र गुन्हा केला हे सरकार पक्षाने सिध्द केले आहे काय ? | **नकारार्थी** |

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| २. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र. १ करीता

**३.** सरकार पक्षाने आरोपीविरूध्द सदरचा गुन्हा सिध्द करण्यासाठी केवळ एक साक्षीदार तपासला आहे. साक्षीदार भिमराव गुलाब आडे, हे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी असुन त्यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले आहे की दिनांक २२/०६/२०२४ ते खंडाळा पोलीस स्टेशन येथे पो.हे.कॉ. म्हणुन कर्तव्यावर असतांना त्यादिवशी ते सोबत पो.कॉ.पिंकु राठोड असे दोघेजण लोहरा ईजारा येथे प्रोहीबिशन कामी रेड मारण्याकरीता गेलो असता त्यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, लोहरा येथील आरोपी हा दारुची चोरटी विक्री करत आहे. सदर माहिती मिळाल्यावर ते आरोपीच्या घरी गेले व त्यांच्या घराची झडती घेतली असता त्यांना त्याठिकाणी गावठी हातभट्टीची दारु १२ लिटर एका डबकीमध्ये आढळुन आली. सदर मुद्देमालातुन १८० एम.एल. दारु रासायनिक प्रयोगशाळेकरीता सिलबंद करुन उर्वरीत दारु जागेवरच नष्ट केला व त्याबाबतचा नि.क्र. पि१ कडील घटनास्थळ पंचनामा तयार केला.

**४.** त्यानंतर त्यांनी आरोपीस सुचनापत्रावर सोडुन शासनातर्फे पो.स्टे.खंडाळा येथे आरोपीविरुध्द नि.क्र.२ कडील फिर्याद नोंदवली. त्यानंतर सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल पोलीस स्टेशनच्या मालखान्यात जमा करुन त्याबाबतची नि.क्र. पि४ कडील पावती तयार केली.

**५.** आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासा दरम्यान त्यांनी असे कथन केले आहे की ज्या घरातून त्यांनी मुददेमाल जप्त केला होता ते घर आरोपीच्या नावे असल्याबाबत त्यांनी

कोणताही कागदोपत्री पुरावा हस्तगत केला नाही. या व्यतिरिक्त विचारण्यात आलेल्या सर्व प्रश्नांना नाकारार्थी उत्तरे दिली.

६. अभिलेखावरील पुराव्यावरून असे दिसुन येते की प्रस्तुत प्रकरणात घटनेच्यादिवशी आरोपीच्या ताब्यातून गावठी हातभटटीची दारु जप्त करण्यात आली होती. प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुददेमाल हा दारु होती, ही बाब सिध्द करण्याकामी अभियोगपक्षातर्फे अभिलेखावर जप्त दारूबाबत रासायनिक विश्लेषणाचा कुठलाही अहवाल दाखल केला नाही. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणातील जप्त मुददेमाल हा दारु होती याबाबत ठोस व निशयित असा पुरावा अभिलेखावर येवू शकला नाही. त्यामुळे अभियोग पक्ष हा आरोपीविरुध्दचा गून्हा निसंशयीतरित्या सिध्द करू शकला नाही. त्यामुळे आरोपी हे सदर गुन्ह्यातुन निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहेत. सबब, मी मुद्दा क्र. १ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. २ करीता</u>**

७. मुद्दे क्र. १ चे नकारार्थी निष्कर्षानुसार आरोपी हे निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरले आहे. प्रस्तुत प्रकरणात पोलिसांनी आरोपीच्या घरी एका प्लॅस्टीक डबकीत १२ लिटर गावठी हातभटटी दारु अशी एकूण किंमत ७००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त केली. सदर दारू ही आव्हानीत कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक पुसद यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीस्तव पाठवुन देणे न्यायोचित होईल. प्रस्तुत न्यायनिर्णयाविरूध्द आव्हान करणेकामी आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ अन्वये रक्कम रूपये १५,०००/– चे बंधपत्र व जातमुचलका देण्याचे निर्देष देण्यात आले आहे. सबब, मी मुद्दा क्र. २ करीता खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे –



न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग

सं.क्रि.केस क्र. १८१२/२०२४
शासन -वि-देविदास
न्यायनिर्णय
नि.क्र. ०५ लगत

# आदेश

१. आरोपी देविदास गोबरा चव्हाण यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २५५(१) अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ ई नुसारचे गुन्हयामधुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे बंधपत्र व जामीनपत्र रद्द करण्यात येत आहे.

३. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल दारू अपील कालावधीनंतर राज्य उत्पादन शुल्क अधिका–यांकडे नियमाप्रमाणे नष्ट करण्याकरीता देण्यात यावा.

४. आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७–अ प्रमाणे जमानतीची पूर्तता करावी.

CHONDE GAJANAN GOVINDRAO
Digitally signed by CHONDE GAJANAN GOVINDRAO
Date: 2026.08.01 18:22:48 +0530

दिनांक – ३१/०७/२०२६

**(जी. जी. चोंडे)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, पुसद**

सं.क्रि.केस क्र. १८१२/२०२४
शासन -वि-देविदास
न्यायनिर्णय
नि.क्र. ०५ लगत

## CERTIFICATE

"I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | Smt. D.S. Kurzadkar/Kolhe<br>Stenographer Grade-I |
| Name of the Court | Jt. C.J.J.D.and J.M.F.C, Pusad |
| Date of Signature of Presiding Officer | 31/07/2026 |
| Date of Judgment Uploaded | 31/07/2026 |

दिनांक – ३१/०७/२०२६

(दि.सु.कोल्हे)
लघुलेखक श्रेणी–१, यवतमाळ.
सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पूसद,


न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग